वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या कलम २ नुसार केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त झालेल्या वनजमिन वळती करण्याच्या प्रकरणामध्ये राज्य शासनाकडून औपचारिक आदेश निर्गमित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्र. एफएलडी-२०१४/प्र.क्र.२२फ-१०

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक:२१/०२/२०१४

राज्यातील ऊर्जा प्रकल्प, पाटबंधारे प्रकल्प, रस्ते, पाण्याचीं पाईपलाईन, विद्युतवाहिन्या, लोहमार्ग, पोलिस ठाणे इत्यादी शासकीय विभागांच्या विकासकामांच्या तसेच काही खाजगी प्रयोजनांसाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८०च्या कलम २ नुसार वनजमिन वळती करण्याचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात येतात. त्यावर केंद्र शासन प्रथम तत्त्वत: मान्यता देऊन काही अटींची पूर्तता करण्यास कळविण्यात येते. प्रकल्प यंत्रणेने सदर अटींची पूर्तता केल्यानंतर केंद्र शासनाकडून वनजमिन वळती करण्यास अंतिम मान्यता देण्यात येते. परंतू, अशी मान्यता प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनाने स्वतंत्ररित्या वनजमिन वळतीकरणाचे अंतिम आदेश निर्गमित न केल्यास या आदेशाने बाधित होणाऱ्या अथवा या आदेशांबाबत काही गाऱ्हाणे असल्यास अशा व्यक्तीला या आदेशांविरुध्द अपिल करण्याची संधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम २ नुसार वनजमिन वळती करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर संबंधित राज्य शासनाने वनजमिन वळती करण्याबाबत स्वतंत्ररित्या सविस्तर आदेश निर्गमित करावेत अशा आशयाचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने विमलभाई व इतर विरुध्द केंद्र शासन व इतर यांच्या अपिल क्र. ७/२०१२ यामध्ये दि.७.११.२०१२ रोजी दिले आहेत.

२. ही पार्श्वभूमी लक्षात घेता महाराष्ट्रातील वनजमिन वळती करण्याच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून औपचारिक मान्यता मिळाल्यानंतर प्रत्येक प्रकरणात राज्य शासनाकडून स्वतंत्ररित्या आदेश निर्गमित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वनविभागातील सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम २ नुसार वनजमिन वळती करण्याच्या प्रस्तावास केंद्र शासनाने अंतिम मंजुरी दिल्यानंतर वनजमिन वळती करण्याची प्रक्रिया सुरु न करता, राज्य शासनाकडून स्वतंत्र व औपचारिक आदेश निर्गमित केल्यानंतरच प्रत्यक्ष वनजमिन प्रकल्प यंत्रणेस वळती करण्याची प्रक्रिया चालू करण्यात यावी. ज्या प्रकरणात केंद्र शासनाकडून अंतिम मंजुरी प्राप्त झाली आहे परंतू राज्य शासनाने स्वतंत्र आदेश निर्गमित केलेले नाहीत त्या प्रकरणांमध्ये देखील राज्य शासनाच्या स्वतंत्र आदेशाची प्रतिक्षा करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.चं.मयेकर)
अवर सचिव

प्रत:

१. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संवर्धन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. सर्व मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक / उपवनसंरक्षक
९. निवड नस्ती फ-१० कार्यासन